शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank

# माध्यमविद्या

शनिवार, दि. १० जून २०१७

वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाचे प्रायोगिक प्रकाशन

आव्हान-२०१७
विशेषांक

खासगी वितरणासाठी



कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त राज्यस्तरीय आव्हान-२०१७ या आपत्ती व्यवस्थापन शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात असलेल्या छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन केले. याप्रसंगी सुजीव मुल्ही यांनी टिपलेले विहंगम छायाचित्र

# राज्यपाल आज विद्यापीठात

## आव्हान-२०१७ चा समारोप : पालकमंत्री ना. पाटील, महापौर सौ. फरास, कुलगुरू डॉ. शिंदे यांची उपस्थिती

**कोल्हापूर: प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती चे. विद्यासागर राव येत्या शनिवारी (दि. १०) शिवाजी विद्यापीठात येत आहेत. विद्यापीठात सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराचा समारोप समारंभ मा. कुलपती यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.**



राज्यपाल चे. विद्यासागर राव

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात साकारण्यात येत असलेल्या 'चॅन्सलर्स कोकोनट गार्डन'चे उद्धाटन आणि रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमीपूजन मा. कुलपती राव यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील, महापौर हसिना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शनिवारी सकाळी १०.३० वाजता हा समारंभ होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ जूनपासून 'आव्हान-२०१७' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एन.डी.आर.एफ.) **(पान २ वर)**

**आतील पानात**

- **कुलगुरूंनी गिरवले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे**
- **शिवराय शौर्याबरोबरच ज्ञानाचे प्रतिक : कुलगुरू डॉ. शिंदे**
- **हॅन्डसेट निर्मितीत संधी/अग्रलेख**
- **अधिकारी/स्वयंसेवकांच्या भावना**
- **आव्हान २०१७ क्षणचित्रे**

# शिस्त, समयसूचकतेतून आपत्तीवर मात

## विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील : आव्हान-२०१७ चे उद्घाटन

**कोल्हापूर : सागर कांबळे**

**शिस्त, समयसुचकता आणि सुदृढ मन व शरीर या सूत्रांचा अवलंब केल्यास जीवनात येणाऱ्या आपत्तींवर मात करण्यास मदत होईल, असे मत कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांनी व्यक्त केले. आव्हान-२०१७ या राज्यस्रीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.**

नांगरे-पाटील यांनी देशावर आलेल्या २६/११ दहशतवादी हल्ला आपत्तीप्रसंगीच्या घटनेचे अनुभव कथन करत असताना अंगावरती शहारे आणणारे प्रसंग विद्यार्थ्यांसमोर उभे केले. अशा आपत्तीवेळी स्वत: प्रसंगावधान राखून व्यवस्थापन करणे गरजेचे असते, असेही त्यांनी नमूद केले.




कोल्हापूर : आव्हान-२०१७ या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन समारंभात बोलताना विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, डावीकडून डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. अतुल साळुंखे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, सी. डी. इंगळे (छाया:जनसंपर्क कक्ष)

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन या शिबिराचे राज्यपाल कार्यालयाच्या अंतर्गत आयोजन करण्याची संधी विद्यापीठास मिळाली आहे. हा विद्यापीठाच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान आहे. विद्यार्थी हे उत्साहाने भारलेले असतात. या उत्साहाचा समाजासाठी उपयोग होण्याची संधी म्हणून या प्रशिक्षणाकडे पाहायला हवे.

यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी .के. गायकवाड, एनडीआरएफचे निरीक्षक सी. डी. इंगळे आदींसह १८ विद्यापीठातील १२२२ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या माध्यमविद्या या विशेष अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.